# प्रेसनोट

दिनांक- १३/११/२०१८.

## वसई येथील भुमी अभिलेख सर्वेक्षण अधिकाऱ्याला लाच स्विकारताना अटक

दिनांक १३/११/२०१८ रोजी, भुमी अभिलेख कार्यालय, वसई येथील सर्वेक्षण अधिकारी, **दिनेश नारायण पष्टे**, वय- ५० वर्षे, यांना यातील तक्रारदार यांच्याकडून पैशाची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिचकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांचे बेकायदेशीर बांधकाम असलेले ६ गाळे निष्कासित न करण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे ५०,०००/-रुपये लाचेची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदवली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन ॲसीबी, ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करुन लोकसेवक **दिनेश नारायण पष्टे** यांना तक्रारदार यांच्याकडून २५,०००/- रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास श्रीमती अंजली आंधळे, पोलीस उप अधीक्षक, ॲसीबी, ठाणे हे करत असुन त्यांचा संपर्क क्र. ९८३३८६४४६९ असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

१) टोल फ्री क्र. :- १०६४
२) दुरध्वनी क्रमांक :- ०२२-२५४२७९७९,२५४३१३८८
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**